




वैजयंती डांगे



# आधुनिक शक्तीपीठे








# आधुनिक शक्तीपीठे

## वैजयंती डांगे

ई साहित्य प्रतिष्ठान

# आधुनिक शक्तीपीठे

लघुचरित्रसंग्रह

लेखिका : वैजयंती डांगे

Email :- vaijayanti62@gmail.com

Ph : 9922627096

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

©esahity Pratishthan®2014

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# भुमिका

आधुनिक किंवा मॉडर्न स्त्री म्हटलं की सर्वसाधारणपणे पाश्चिमात्य स्त्री समोर येते. साधारण एखाद्या स्त्रीकडे पाश्चिमात्य पेहराव, केशभूषा आणि इंग्लिश भाषा या गोष्टी असल्या म्हणजे ती स्त्री आधुनिक किंवा मॉडर्न असा समज आहे. पण हे नेहमीच खरे असेल असे नाही. कारण आधुनिकता विचार, मुल्यं आणि वागणुकीत असायला हवी. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मुल्यं आणि बुद्धीवादी आणि धाडसी वृत्ती म्हणजे आधुनिकता. जर का या कसोटीवर पाहिलं तर भारतीय स्त्रिया कायमच पाश्चात्य स्त्रियांहून मैलोगणिक पुढे होत्या आणि आहेत. पुराणातल्या गार्गी, कैकेयी पासून ते अहिल्याबाई होळकर ते अहिल्या रांगणेकरांपर्यंत धाडसी आणि बुद्धीमान स्त्रियांचं उदाहरण आपल्यासमोर आहे. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात स्त्रिया कायम पुढे होत्या. गंमत म्हणजे इंग्लंड आणि अमेरिकेत स्त्रियांना मतदाना चा अधिकार शेकडो वर्षे नव्हता. आमच्या इथे जिजाबाई सारख्या स्त्रिया खुद्द महाराजांना डावपेचाचे सल्ले देत असत.

मात्र आज परिस्थिती पालटते आहे खरीच. भारत हा कॉस्मेटिक्सची सर्वात मोठी बाजारपेठ बनतो आहे. मुलींना गोरेपणाच्या क्रीम्स, केस गळणं आणि मुरुमं यावेगळी चिंताच नाही की काय अशा जाहिरातींचा आणि वृत्तपत्रीय लेखांचा मारा सुरू आहे. मुलींनी फ़क्त सुंदर दिसावं आणि पुरुषांनीच काय ते धाडस आणि बौद्धिक काम करावं अशी संस्कृती पसरवली जात आहे.

या पुस्तकात पाश्चात्य जगात स्त्रियांनी केलेल्या धाडसी विक्रमांचा आणि एक माणूस, एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून आपला अधिकार सिद्ध करण्याच्या लढायांचा इतिहास अगदी थोडक्यात मांडला आहे. केवळ दहा स्त्रियांची उदाहरणं आहेत. पण ही उदाहरणं घेऊन आपण, आपल्यातली एक जरी मुलगी काही नवीन, धाडसी वाट चोखाळायला निघाली तरी हे पुस्तक सार्थ झाल्यासारखं वाटेल.

टीम ई साहित्य

# अनुक्रम


जगातील पहिली वॉर फोटोग्राफर : मार्गारेट बोर्क – व्हाईट

बर्थ कंट्रोल शब्दाची जननी : मार्गारेट सॅनगर

दोन वेळा विम्बल्डन जिंकणारी पहिली काळी टेनिसपटू : अलथेआ गिब्सन

महासागरावरून उड्डाण : एमेलिया एरहार्ट

अमेरिकेतील पहिली कृष्णवर्णीय उद्योजिका : मॅडम सी. जे. वॉकर

रणरागिणी : जोन ऑफ आर्क

दोन नोबेल मिळवणारी पहिली महिला शास्त्रज्ञ : मादाम मेरी क्युरी

चीम्पांझीची मैत्रीण : जेन गुडाल

धाडसी पत्रकार : नेली ब्लाय

गुलामांची उद्धारकर्ती : हॅरियट टबमन

जगातील पहिली वॉर फोटोग्राफर

## मार्गारिट बोर्क – व्हाईट



लढाई किंवा युद्ध म्हणले कि आपण सगळेच युद्धाचे अनुभव आणि थरार ऐकण्यास उत्सुक असतो. आपल्याकडे महिलांनी युद्ध गाजवली आहेत युद्ध आणि महिला म्हणाल्यावर जिजाबाई, झाशीची राणी ही नावे आठवल्याशिवाय राहत नाही.

रस्त्यावरचा अपघात पाहून सुद्धा आपल्याला घाबरायला होते. पण मार्गारिट मात्र धाडसी होती दुसऱ्या महायुद्धात प्रत्यक्ष रणांगणावर जाऊन तिने युद्धाचे छायाचित्रण केले.

अमेरिकेच्या न्यूयॉर्क शहरातील बाल छायाचित्रकार मुलगी म्हणून मार्गारिटने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. विशेष म्हणजे जगात त्यावेळी सर्वात उंच असलेल्या ख्रिसलर या बिल्डिंग मधील अगदी वरच्या मजल्यावर तिचा स्टुडीओ उभारलेला होता अचूकपणे छायाचित्रण करता यावे यासाठी तिने तिथे तोल सांभाळून आपला स्टुडीओ निर्माण केलेला होता. तिथे उभे राहून काम करणे अतिशय अवघड होते. काही वेळेला तर अक्षरशः एका पायावर उभे राहून काम करावे लागे. चुकून जरी तोल गेला असता तर समोर फक्त मृत्यू होता.

मातृप्रेमाच्या निष्ठे मुळे तिने वयाच्या बाविसाव्या वर्षी आपल्या आडनावापूर्वी आईचे बोर्क हे नाव आपल्या नावापुढे जोडले

'फॉरच्युन आणि लाइफ' या जगप्रसिध्द नियतकालिकांच्या पहिल्या छायाचित्रकारापैकी एक म्हणून मार्गारिट गणली जाते. इ. स. १९३० मध्ये पाश्चिमात्य छायाचित्रकारापैकी मार्गारिट अशी पहिलीच छायाचित्रकार होती की जिला त्यावेळच्या सोव्हिएत युनियन मध्ये छायाचित्रण करण्यास जाण्याची परवानगी मिळाली होती रशियाच्या औद्योगिक क्षेत्राची जी छायाचित्रे मार्गारिटने घेतली होती त्यांचा संग्रह तिने 'आय ऑन रशिया' या पुस्तकातून प्रसिद्ध केला. इ. स. १९३० च्या मध्य काळात मनुष्य हा विषय निवडून त्यावर तिने काम केले.

पुढे दुसऱ्या महायुद्धास तोंड फुटले आणि मार्गारिट अस्वस्थ झाली. छायाचित्रणा साठी जिवावर उदार होऊन तिने रणांगणावरील धुमश्चक्रीत उडी घेतली. त्यावेळी तिच्यावर प्राणसंकटे सुद्धा ओढवली होती. उत्तर आफ्रिकेतील आणि इटली मधील युद्धाचे प्रत्यक्ष छायाचित्रण करणारी

ती पहिलीच महिला छायाचित्रकार होती. परंतु हा सन्मान मिळविण्यासाठी तिला उत्तर अफ्रिकेच्या प्रवासात टोरपेडो च्या प्राणघातक हल्ल्यास तोंड द्यावे लागले होते. तिच्यावर झालेल्या या हल्ल्यातून केवळ नशिबानेच ती वाचली होती. प्रत्यक्ष रणभूमीवर हवाई प्रवास करून जाऊन छायाचित्रण करणारी जगातली पहिली छायाचित्रकार म्हणून मार्गारिटचे नाव जगप्रसिद्ध झाले.

ज्या गोष्टी ऐकून सुधा आपल्या अंगावर काटा येतो तिथे प्रत्यक्ष जाऊन तिथल्या परिस्थितीचे छायाचित्रण मार्गारिट करत होती.

१९४५ नंतर मार्गारिटने ऱ्हाइन नदी पार करून जनरल पाटोन्स च्या लष्करा सोबत जर्मनी मध्ये आपला मोर्चा वळविला. नाझी मृत्यूछावण्यांचे ( छळ छावण्यां ) छायाचित्रण करणाऱ्या पहिल्या चमूत मार्गारिटला अधिकृत स्थान मिळाले होते. हिटलर च्या gas चेम्बर्स मधील माणसांच्या हाडांच्या सापळयांचे व मृत देहांचे छायाचित्रण मार्गारिटने केले होते. या छायाचित्रांचा संग्रह तिच्या ' dear father land rest quietly ' या पुस्तकात समाविष्ट केलेला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर मार्गारिट भारतात आली होती. महात्मा गांधींचे छायाचित्रण तिने केले होते. कोरियातील भयानक युद्धाचे सुद्धा चित्रण तिने केले होते. १९५० च्या पूर्वार्धात मार्गारिट पर्किन्सन्स च्या विकाराने आजारी झाली. त्यामुळे छायाचित्रकार म्हणून तिच्या जगण्यावर मर्यादा आल्या. ती आपला सारा वेळ लेखन करण्यात व जमेल तेंव्हा छायाचित्रण करण्यात घालवीत असे. इ. स. १९७१ मध्ये विसाव्या शतकाच्या महत्वपूर्ण घटनांचे छायाचित्रण करणारी मार्गारिट बोर्क - व्हाईट ही पहिली war फोटोग्राफर, जागतिक कीर्ती मिळवून अनंतात विलीन झाली.

## बर्थ कंट्रोल शब्दाची जननी

# मार्गारिट सॅनगर (Sanger)



लेडी ऑफ कॉनट्रासेप्शन किंवा कुटुंब नियोजनाची जननी किंवा गरिबांची वाली म्हणून विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात जगात प्रसिद्ध झालेली अमेरिकेतील महिला म्हणजे मार्गारिट सॅनगर. कुटुंब नियोजना सारखा तत्कालीन अश्लाघ्य विषय मार्गारिटने हाताळल्याने अत्यंत धाडसी आणि शूर महिला म्हणून तिची गणना साऱ्या जगात केली जाते. अकरा मुलांची माता असलेली आणि सात वेळा गर्भपातास जिला तोंड द्यावे लागले अशी मार्गारिटची आईच तिच्या कार्याला प्रेरक ठरली. आई कडे पाहूनच तिला विषयाचे गांभीर्य लक्षात आले आणि तिने या विषयाला हात घालायचे ठरवले.

मार्गारेट न्युयॉर्कला रहात होती. तिच्या घराजवळच असलेल्या अत्यंत दरिद्री वस्ती मधील स्त्रियांचे लादलेल्या प्रसूती वेदनांमुळे आणि प्रसुतींमुळे आलेले मृत्यू तिने पहिले होते. अनारोग्याच्या विळख्यात सापडलेल्या स्त्रियांसाठी आपण काही तरी करावे या विचाराने मार्गारेटला झपाटले होते.

मार्गारेट ही अमेरिकेच्या सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातली एक सामान्य परिचारिका होती. परंतु चर्चद्वारे बाप्तिस्मा मिळाल्यानंतर या साध्या परिचारिकेची गरिबांसाठी क्रांतिकारक स्वरूपाचा आवाज उठवणारी स्त्री झाली. सुरवंटाचे फुलपाखरात रुपांतर व्हावे असे परिवर्तन तिच्या व्यक्तिमत्वात झाले. आणि स्त्रियांना अपत्य जन्माबाबतचा हक्क मिळवून देण्याच्या चळवळीचे नेतृत्व मार्गारेट कडे गेले. मार्गारेट सॅनगर चा विचार करताना आपल्याला र. धो. कर्वे यांची आठवण होते. घराजवळ असलेल्या झोपडपट्टीत ती परिचारिका म्हणून वारंवार भेट देत असे. गर्भारपण आणि बाळंतपणामुळे मृत्यूमुखी पडणाऱ्या आणि शरीरानी खंगलेल्या स्त्रिया आणि पोटाची खळगी भरण्यासाठी रस्त्यावर भिक मागणारी पोरे मार्गारेट पहात होती. लादलेल्या गर्भारपणामुळे स्त्रियांची आणि त्यांच्या मुलांची वैयक्तिक हानी तर होत होतीच पण त्याच बरोबर सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रातही समस्या निर्माण झाल्या होत्या. सध्या आपण सुद्धा लोकसंख्येच्या भस्मासुराचा सामना करतोच आहोत. हे सगळे पाहून नुसती हळहळ व्यक्त न करता किंवा गरीब स्त्रियांची वंचना नुसती तटस्थपणे पहात न राहता त्या स्त्रियांना ती कुटुंबनियोजना बद्दल माहिती देऊ लागली, सल्ला देऊ लागली. त्यामुळे त्या गरीब स्त्रियांना मार्गारेट त्यांची उद्धारकर्ती वाटू लागली. 'वुमन रिबेल' नावाच्या नियतकालिकाची १९१४ मध्ये निर्मिती करून तिने आणखी एक धाडसी पाऊल टाकले. 'वुमन रिबेल' मधुन स्त्री शरीर रचना आणि अपत्य निर्मिती बाबत उघड उघड पणे वा स्पष्ट शब्दातुन मार्गारेट बोलू लागली. आजच्या दृष्टीने वरवर पहाता चांगल्या वाटणाऱ्या तिच्या कृतीने त्याकाळी अश्लीलतेच्या आरोपाखाली तिला अटक झाली.

१९१६ मध्ये न्युयॉर्क मधील ब्रुकली विभागातील ब्राऊन व्हिले येथे जगातील पहिल्या कुटुंबनियोजन केंद्राची स्थापना मार्गरिट ने केली. या स्त्रियांविषयीच्या सामाजिक कार्याबद्दल त्यावेळच्या अमेरिकन सरकारने तिला अटक करून तुरुंगात ठेवले. मार्गरिटच्या वकिलांनी तिची नुसती सुटकाच केली नाही तर न्यायाधीशांकडून एक ऐतिहासिक स्वरूपाचा निर्णय सुद्धा मिळवला. या निर्णयामुळे कोणत्याही डॉक्टरांना आपल्या पेशंट्सना कुटुंबनियोजनाची माहिती देणे शक्य झाले. एवढे सगळे झाले तरी अजून खरी लढाई जिंकली नाही हे मार्गरिट जाणून होती.

त्यामुळे इथेच न थांबता ती आणखी जोमानी कामाला लागली.तिला अनेक दशके उपहास, उपरोध, चेष्टा टवाळी, आणि तुरुंगवास सोसावा लागला. शेवटी दुसऱ्या महायुद्धानंतर सरकारला वाढत्या लोकसंख्येची काळजी वाटू लागली आणि मार्गरिटच्या विचारांचे महत्व पटू लागले. आणि कायदेशीररीत्या कुटुंबनियोजनाचे लेखी स्वरुपात मार्गदर्शन देण्यास न्यायालयाने १९३६ साली परवानगी दिली. अशा प्रकारे मार्गरिटने एक ऐतिहासिक लढाई जिंकली होती. मार्गरिटने जिंकलेली लढाई म्हणजे स्त्रियांसाठी नव्या युगाचा प्रारंभ होता. १९१० ते १९१५ या अवघ्या पाच वर्षात तीन लाख स्त्रिया प्रसूतीकाळात अमेरिकेत मृत्यू पावल्या होत्या हा आकडा पाहिल्यावर तिच्या कार्याची महती लक्षात येते.

मार्गरिट सॅनगरने आपल्या जीवनकार्याचे सूत्र केवळ एका वाक्यात सांगितले होते, ते म्हणजे "मी जे सर्व काही करते ते एकाच ध्येयाने प्रेरित होऊन करत आहे आणि ते म्हणजे पालकांना आपली सर्व मुले ही लाडकी आणि हवीशी असावीत."

आज ही पूर्वी इतकेच मार्गरिटच्या कार्याचे महत्व वाटते. मार्गरिट सॅनगर सेंटर international, २६ ब्लीकर स्ट्रीट, न्यूयॉर्क सिटी हा फलक असलेले आजचे अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय कीर्तीचे केंद्र म्हणजे मार्गरिट सॅनगर च्या कार्याचे एक स्मारकच आहे.

दोन वेळा विम्बल्डन जिंकणारी पहिली काळी टेनिसपटू

## अलथेआ  गिब्सन



टेनिस क्षेत्रात जागतिक पातळीवर गेली काही वर्षे सेरेना आणि विल्यम्स या ( काळया किंवा निग्रो ) भगिनी अनभिषिक्त सम्राज्ञी म्हणून राज्य करीत आहेत. त्या काळया असून त्यांना गोऱ्यांबरोबर कसे खेळता येते किंवा गोऱ्यांच्या देशाचे प्रतिनिधित्व त्यांना कसे करता येते हे प्रश्न आता आपल्याला पडत नाहीत. पण १९५० पर्यंत अमेरिका व इंग्लंडमध्ये काळया स्त्रीलाच काय पण पुरुषानाही विम्बल्डन मध्ये केवळ काळे किंवा निग्रो आहेत म्हणून प्रवेशच नव्हता.

अलथेआच्या पूर्वी काळी ओरावाशिंग्टन ही १९२० ते १९३० च्या काळात गाजली होती केवळ काळया लोकांकरता असलेल्या अमेरिकन टेनिस असोसिएशनवर तिचे प्रभुत्व होते. सलग १२ वेळा तिने अजिंक्यपद पटकावले होते परंतु

गोऱ्यांबरोबर आणि दर्जेदार स्पर्धांमध्ये तिला खेळण्यास परवानगी नव्हती. अलथेआ ही न्यूयॉर्क मधील कृष्ण वर्णीयांची वस्ती असलेल्या हार्लेम सारख्या झोपडपट्टिच्या ठिकाणी लहानाची मोठी झाली

टेनिस विषयी तिला उपजतच आकर्षण होते. विटांच्या भिंतीवर रबरी चेंडू मारत तिने या खेळाचे प्राथमिक धडे गिरवले कोणत्याही क्षेत्रात क्रमांक एक ची जागा मिळवण्यास नुसती मुळची प्रतिभा असून चालत नाही सातत्य, कठोर परिश्रम आणि दृढ निश्चय हे गुण आणि त्याच बरोबर योग्य मार्गदर्शन आणि संधी मिळणे सुधा महत्वाचे असते.

आणि हि संधी अलथेआला मिळाली होती. १९५७ - ५८ अशी सलग दोन वर्ष विम्बल्डन चे अजिंक्य पद मिळवल्यावर तिने निवृत्ती जाहीर केली त्याकाळी विम्बल्डन विजेत्यास भल्या मोठ्या रकमेची पारितोषिके मिळत नसत. अलथेआने तिला मिळालेले विम्बल्डन अजिंक्यपदाचे चषक स्मिथसोनियन इन्स्टीटयूशन्स national म्युझिअम ऑफ अमेरिकन हिस्ट्री या संस्थेकडे १९८८ मध्ये सुपूर्द केले. अलथेआच्या या क्षेत्रातील प्रवेशावर मोठे प्रश्नचिन्ह होते. ती एक उत्तम आणि अभिजात खेळाडू असल्याची खात्री तिच्या चाहत्यांना आणि संयोजकांनाही पुन्हा पुन्हा वाटत होती. तिचे खेळातील श्रेष्ठत्व रंगभेद न करता लक्षात घेतले पाहिजे असे सर्व जाणकारांना वाटत होते. शेवटी सुप्रसिद्ध टेनिसपटू अलीस मार्बल हिने संयोजकांच्या डोळयात झणझणीत अंजन घातले. १९५० साली प्रथम फ़ॉरेस्ट हिल्स स्पर्धेसाठी आणि ५१ साली विम्बल्डन साठी अलथेआला निमंत्रित करण्यात आले. अंगच्या गुणांनी १९५७ - ५८ साली सलग दोन वर्ष विम्बल्डन अजिंक्यपद पटकावून तिने टेनिस क्षेत्रातील काळया रंगाचा अडसर पुढील पिढी साठी कायमचा दूर केला. एवढच नाही तर लेडीज प्रोफेशनल गोल्फ असोसिएशनच्या वर्णभेदाच्या तटबंदी ही तिने मोडून काढल्या. १९५७ आणि ५८ या दोन्ही वर्षी असोसिएटेड प्रेसचे वुमन athlete ऑफ द इयर हा किताब देऊन तिच्या यशाचा गौरव केला.

## महासागरावरून उड्डाण

# एमेलिया एरहार्ट



एमेलिया एरहार्ट ही जणू आकाश उड्डाणाचे स्वप्न घेऊनच अमेरिकेतील कान्सास राज्यात अचिसन या गावी २४ जुलै १८९७ मध्ये जन्मास आली. एकदा वडिलांबरोबर कॅलीफोर्नियातील विमानांचा आकाश उड्डाणांचा प्रदर्शनीय खेळ पाहण्यास गेली होती. तेव्हापासूनच आकाश उड्डाणाचे वेड तिच्या डोक्यात शिरले. त्या वेळी तिचे वय २३ वर्षे इतके होते. तिने विमानोड्डानाचे प्रशिक्षण घेण्यास सुरवात केली. स्वतःजवळ होते नव्हते ते सगळे पैसे खर्च करून

'किन्नर एअरस्टर एअरक्राफ्ट' हे विमान विकत घेतले.

हा शौक सामान्य माणसाच्या खिशाला परवडणारा नव्हता. त्यामुळे आपला छंद जोपासण्यासाठी पैसे मिळवण्याकरता तिने अपार कष्ट केले. अगदी दगड वाहून नेण्याचे बिगारी कामही तिने केले. ज्या काळात लोक विमान प्रवासाला भीत असत, त्या काळात एमेलिया वैमानिक बनली होती.

तिने विमान उड्डाणाच्या क्षेत्रातील अनेक पारितोषिके मिळवली होती. परंतु अटलांटिक महासागरावरून तिने केलेला प्रवास चिरस्मरणीय ठरला. असा प्रवास करणारी ती जगातली पहिली महिला होती. तिचा हा प्रवास वेगाच्या संदर्भात जागतिक विक्रम करून गेला होता. एमेलियाने दोन हजार सव्वीस मैलांचा अटलांटिकचा विमानोड्डाणाचा प्रवास अवघ्या चौदा तासात केला होता. त्या चौदा तासात झोप अथवा डुलकी लागू नये म्हणून तिने स्मेलिंग सॉल्ट वापर केला होता खाद्य पदार्थांमुळे सुस्ती येऊ नये म्हणून तिने फक्त tomato सूप बरोबर नेले होते. अटलांटिक वरील यशस्वी उड्डाण करून अमेरिकेत परतल्यावर तिचे भव्य स्वागत झाले होते. एमेलियाला मात्र गौरव, समारंभ, मिरवणुका या पेक्षा अज्ञाताच्या ओढीची स्वप्ने पाहण्यातच रस वाटे, कारण इतर कोणत्याही गोष्टी पेक्षा विमानोड्डाण करण्यावर तिचे अंतःकरणपूर्वक प्रेम होते.

एमेलियाचे वैशिष्ठ्य असे की तिला मिळालेले प्रत्येक पदक आणि मिळालेला प्रत्येक सन्मान तिने अखिल स्त्री जातीच्या वतीने स्वीकारला होता. तिच्या वैयक्तिक जीवनातील यशस्वी कालखंडात अमेरिकेत अत्यंत मंदीचा कालखंड होता तिच्या प्रत्येक उपक्रमाने मंदीत असलेल्या तिच्या देशाला वैभवशाली भविष्याच्या दिशा दिसू लागल्या होत्या.

विषुववृत्तावर जाऊन शक्य तेवढ्या लांबच्या मार्गाने पृथ्वी प्रदक्षिणा करणारी पहिली महिला वैमानिक म्हणून विक्रम करण्याची योजना तिने आखली होती. तिच्या आयुष्यातली अखेरची आणि अपूर्ण ठरलेली ती योजना होती. नुसती अखेरचीच नव्हे तर एमेलियाच्या जीवनाची अखेर करणारीच ती योजना होती. या योजनेत ती व तिचा सहवैमानिक एकूण एकोणतीस हजार मैलांचा प्रवास करत होते. पण बावीस हजार मैलांचा प्रवास केल्यानंतर केवळ सात हजार मैलांचा प्रवास शिल्लक असताना २ जुलै १९३७ एमेलिय तिचा सहवैमानिक आणि त्यांचे विमान कुठे अदृश्य झाले त्याचा शोध आजतागायत लागलेला नाही.

काळाच्या पडद्याआडचे ते एक गूढच राहिले आहे.  एमेलियाचा मृत्यू हा सर्वांनाच चटका लावणारा व दुर्दैवी स्वरूपाचा होता. पण तिचे जीवन मात्र अनेक पिढ्यांच्या स्त्रियांना प्रेरक ठरणारे आहे. भयाला आणि निराशेला तिच्या जीवनात स्थान नव्हते. धाडसी वृत्तीची आणि आशावादाची प्रेरणा देणारे तिचे विक्रमी जीवन होते

## अमेरिकेतील पहिली कृष्णवर्णीय उद्योजिका

### madam सी. जे. वॉकर



अमेरिकेत अत्यंत प्रतिकूल सामाजिक परिस्थितीत सराह ब्रीडलव्ह हि मुलगी जन्मास आली. १९१८ साली ती जेंव्हा निधन पावली तेंव्हा तिला madam सी. जे. वॉकर या नावाने सारी अमेरिका ओळखत होती. त्याखेरीज अमेरिकेतील पहिलीच कोट्याधीश उदयोजिका म्हणून तिची सगळयांनाच ओळख पटलेली होती.

केवळ ५१ वर्षे आयुष्य लाभलेली madam वॉकर१८६७ मध्ये जन्माला आली तिच्या वयाच्या अवघ्या पाचव्या वर्षी आई वडील निधन पावले आणि पोरकेपण तिच्या नशिबी आले. वयाच्या चौदाव्या वर्षी तिचे लग्न झाले. एका मुलीचा जन्म झाल्यावर आणि अवघा सहा वर्ष संसार करून झाल्यावर तिच्या वाट्याला पती निधनाचे दुखः आले. एलेलिया या आपल्या छोट्या मुलीस घेऊन सी. जे. वॉकर दोघींच्या उदरनिर्वाहासाठी सेंट लुईस येथे गेली. तेथे अठरा वर्ष तिने लोकांचे कपडे धुवून पोटापाण्याची व्यवस्था केली.

स्वप्न प्रत्येक जणच पाहतो पण आपली भव्य व जगावेगळी स्वप्ने प्रत्यक्षात साकार करणारी माणसेच अलौकिक ठरतात. सी. जे ने केस सरळ करण्याच्या साधननिर्मितीच्या कारखान्याचे स्वप्न पाहिले आणि ते वास्तवात आणले. कुरळया केसांना सरळ करण्याची नवी पद्धत सी. जे ने शोधून काढतानाच उष्णता देणाऱ्या खास स्वरूपाच्या धातूच्या कंगव्याचा शोध तिने लावला. याचा उपयोग आफ्रिकन कृष्णवर्णीय स्त्रियांना फारच झाला.

आपल्या कारखान्यात नवीन प्रकारचा माल तयार करून विक्रीसाठी कुणावर विसंबून न राहता ती स्वतः रस्त्यावर हिंडून आणि दारोदार जाऊन आपल्या नाविन्यपूर्ण वस्तूंची विक्री करीत असे. madam सी. जे. वॉकरच्या परिश्रमाना आणि दूरदृष्टीला चांगले यश लाभले. अवघ्या पाच वर्षात ती खूप श्रीमंत झाली. तिने madam सी. जे. वॉकर manufacturing कंपनी स्थापन करून

तीन हजार लोकांना नोकरी दिली. ती आपल्या कंपनीत सौंदर्य प्रसाधनांचे उत्पादन करीत असे. तिच्या सौंदर्य प्रसाधनांना सर्व स्तरातून खूप मोठ्या प्रमाणावर मागणी असे. madam सी. जे.च्या अनेक कार्यातील सर्वात अभिमानास्पद असे वाटणारे कार्य म्हणजे तिने असंख्य कृष्णवर्णीय स्त्रियांना एजंट म्हणून नोकरी दिली. madam सी. जे. वॉकर आपल्या खेड्यात तिच्या वयाच्या ५१ व्या वर्षी म्हणजेच १९१८ साली किडनी निकामी झाल्याने निधन पावली. डॉक्टरांनी मनाई करून सुद्धा शेवट पर्यंत ती आपल्या कामात व्यग्र राहिली. काम हेच तिचे व्यसन होते.

'मनी वसे ते स्वप्नी दिसे' या उक्ती प्रमाणे तिच्या स्वप्नात आलेल्या उपाययोजना आपल्या प्रतिभेने, बुद्धिमत्तेने, निर्मिती शक्ती ने आणि विक्री कौशल्याने जगासाठी तिने उपलब्ध करून दिल्या आणि आपले नाव सौंदर्य साधनांच्या विश्वात अमर केले. असंख्य तरुण तरुणींसाठी तिचे जीवन चरित्र प्रेरणादायी होते आणि आजही आहे.

रणरागिणी

## जोन ऑफ आर्क



फ्रान्सच्या एका लहानग्या खेड्यात १४१२ साली जन्मलेली एक मुलगी मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठी अल्पवयात जगातील महान योद्ध्याची भूमिका बजावून इंग्रजांशी लढा देता देता आपल्या प्राणांची आहुती देते, ही घटना आश्चर्यकारक आणि प्रेरणादायी आहे.

जोन ऑफ आर्कचे अल्प परंतु चित्तथरारक आयुष्य युरोपच्या इतिहासातील एक चिरंतन स्वरूपाचे झगमगते पान आहे. मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठी प्रत्यक्ष रणांगणावर जाऊन पराक्रम गाजवणाऱ्या जोन ऑफ आर्कचे कर्तुत्व भल्याभल्या सेनाधिकाऱ्यांना आणि राजे महाराजांना लाजविणारे आहे.

वयाच्या अवघ्या सतराव्या वर्षी तिची कॅप्टन

म्हणून नेमणूक करून तिला ऑर्लिन्स शहराची इंग्रजांच्या ताब्यातून सुटका करून घेण्यासाठी पाठवले. ही कामगिरी सगळयांच्या मते अशक्यप्रायच होती, कारण तिच्या जवळ पुरेसे सैन्यबळ नव्हते शिवाय जे सैन्य होत ते  पूर्णपणे मनाने खचलेले होते नैराश्याने ग्रासलेले होते. पण अतिशय थंड डोक्याने परिस्थितीचा आढावा घेऊन अत्यंत चातुर्याने सैनिकांचे नेतृत्व करून तिने रणांगणावर अतुलनीय पराक्रम गाजवला आणि त्या शतकातील आश्चर्याने थक्क करायला लावणारा ऐतिहासिक स्वरूपाचा विजय जोनने मिळवून दाखवला.

अनेकांना तो विजय म्हणजे एक अदभूत चमत्कारच वाटला पुढील वर्षात अनेक शहरांना तिने शत्रुच्या तावडीतून मुक्त केले. दुर्दैवाने फ्रान्सची अत्यंत प्रसिद्ध सेनानी म्हणून जोनची कारकीर्द अल्पकालीनच ठरली. ऑर्लिन्सच्या विजयानंतर केवळ वर्षभराने इंग्रजांनी तिला कैद केले. तिचा तुरुंगात इतका छळ करण्यात आला की ती शेवटी मरणोन्मुख झाली. त्याही अवस्थेत तिने तुरुंगाच्या मनोऱ्यावरून खूप खोलवर उडी मारून निसटून जाण्याचा प्रयत्न केला पण तिला पुन्हा पकडून तुरुंगात डांबण्यात आले.

आपल्या देशाच्या रक्षणासाठी सैनिकी पोशाख घालून लढणे हा आपला अधिकार आहे असे इंग्रज अधिकाऱ्यांना तिने ठणकावून सांगितले. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला तिला देहांताची शिक्षा झाली. इंग्रजांनी तिला जिवंत जाळली. जेंव्हा जोनला जिवंतपणी प्रत्यक्षात अग्नी दिला गेला तेंव्हा एक पांढरे कबुतर फडफडत त्या अग्नीज्वालातून तिच्या आवडत्या फ्रान्सच्या दिशेने उडत गेल्याचे सर्वांना दिसले असे सांगितले जाते.

जोन ऑफ आर्कही जशी रणरागिणी होती तशीच ती गरिबांच्या दृष्टीनी अतिशय उदार वृत्तीची आणि निस्वार्थी वृत्तीची होती. अद्भुत वीरतापूर्ण आणि अनन्वित छळाला सामोऱ्या गेलेल्या तिच्या एकूण जीवनाचा विचार करता आपल्याला झाशीची राणी, संभाजी महाराज, वीर सावरकर आणि अनेक क्रांतिकारक जोनच्या व्यक्तीमत्वात सामावलेले दिसतात.

## दोन नोबेल मिळवणारी पहिली महिला शास्त्रज्ञ

### मादाम मेरी क्युरी



सात नोव्हेंबर १८६७ साली पोलंड मध्ये शिक्षकी पेशातील स्वेतोदोवस्की दाम्पत्याच्या पोटी मादाम मेरी यांचा जन्म झाला होता. रेडियमचा शोध लावून आणि पदार्थ विज्ञान आणि रसायन शास्त्र या विषयातील दोन नोबेल पारितोषिके मिळवून मादाम मेरी क्युरी यांनी आपल्या आयुष्याचे सोने केले. १९ व्या शतकाच्या अखेर पर्यंत विज्ञान क्षेत्राचे दरवाजे महिलांना बंद असताना आणि संशोधन क्षेत्रात पुरुषांची मक्तेदारी असतांना जगातील पहिली महिला शास्त्रज्ञ म्हणून मादाम क्युरी यांनी जागतिक किर्ती मिळवली. न्यूटन, एडिसन, मार्कोनी आणि आईन्स्टाईन या

शास्त्रज्ञांच्या मालिकेत मादाम मेरी क्युरी यांना महत्वाचे स्थान प्राप्त झाले. महात्मा गांधीना त्यांचा मानवतावादी दृष्टीकोन विलोभनीय वाटला तर पं. नेहरू यांना त्यांचा शास्त्रीय दृष्टीकोन महत्वाचा वाटला. लाल बहाद्दूर शास्त्री यांनी तर मादाम क्युरींची मुलगी इव्ह क्युरी हिने लिहिलेल्या मादाम क्युरींच्या चरित्राचा हिंदी भाषेत अनुवाद केला आहे.

रेडियमचा उपयोग उपचारासाठी केला जाऊ लागल्याने त्याचे कण अत्यंत अचूकपणे अलग करण्याची जरूरी निर्माण झाली होती. त्यामुळे रेडियममधून जे किरण परावर्तित होतात त्यावरून रेडियमचे वजन करण्याची पद्धत मादाम क्युरी यांनी शोधून काढली. डिसेंबर १९११ मध्ये स्वीडिश अकॅडमी ऑफ सायन्स या संस्थेने मादाम क्युरी यांना रसायन शास्त्राचे नोबेल पारितोषिक दिले. लिनस पौलिंग या शास्त्रज्ञाचा अपवाद वगळता अन्य कुणाही शास्त्रज्ञाला दोन वेळा नोबेल पारितोषिक आजपर्यंत मिळालेले नाही.

विशेष म्हणजे मादाम क्युरी यांची कन्या इव्ह हिनेही आपले पती फ्रेड्रिक जोलिओ यांच्या भागिदारीत पदार्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळवले. पती, पत्नी, मुलगी आणि जावई अशा चौघांनाही नोबेल मिळण्याची जगातील एकमेव विक्रमी घटना मादाम क्युरीच्या आयुष्यात घडून आली.

रेडियमचा शोध लावून उदात्त, तात्विक विचारसरणी मुळे मादाम मेरी क्युरी आणि त्यांचे पती पिअर क्युरी यांनी पेटंट नाकारून कोट्याधीश होण्याची संधी जाणीवपूर्वक दूर लोटली. दारिद्र्यात राहून विलक्षण प्रतिकूल परिस्थितीशी लढत चिकाटीने, परिश्रमाने, तहान-भूक विसरून प्रकृतीची आबाळ करत या पती पत्नीने मानवतावादी दृष्टीकोनाने जागतिक कीर्तीचे संशोधन केले.

त्यांच्या संशोधनाने नवीन विज्ञान व तत्वज्ञान उदयास आले. कॅन्सरसारख्या एका महाभयंकर रोगावर उपचार करण्याचे साधन मानवजातीच्या हाती आले. आज सांगितले तर आश्चर्य वाटेल की नोबेल पारितोषिक मिळवलेल्या संशोधनासाठी प्रयोग करण्यास मादाम मेरी यांना प्रयोगशाळा नव्हती. 'स्कूल ऑफ फिजिक्स' या संस्थेचे गुदाम मोठ्या मुश्किलीने त्यांना कामासाठी मिळाले होते. जागा दमट होती. त्यात खूप निरुपयोगी सामान भरून ठेवले होते. जिकडे तिकडे कोळी व जळमटे होती. थंडीत पारा शून्याखाली ११० Fahrenheit वर जात असे, अशा प्रतिकूल परिस्थितीत ध्येयवेडाने तहान भूक विसरून युरेनिअम शिवाय थोरिअम मधूनही प्रकाश परावर्तीत होतो हे मादाम मेरी क्युरी यांनी सिद्ध केले. सतत चार वर्षांच्या परिश्रमपूर्वक संशोधनानंतर मादाम मेरी आणि पिअर क्युरी यांनी रेडीअम या घटकाचे अस्तित्व सिद्ध केले.

पिअर यांना १९ एप्रिल १९०६ रोजी Paris येथे रस्त्यावरील एका बग्गीने चिरडले. घोड्यांच्या टापांच्या खाली त्यांच्या शरीराचा चेंदामेंदा झाला. एका महान शास्त्रज्ञाचा असा दुर्दैवी अंत झाला. त्यांच्या मृत्यू नंतर फ्रेंच सरकारने मादाम मेरी यांना पेन्शन दिले, पण मी माझा व मुलींचा चरितार्थ चालवण्यास समर्थ आहे असे सांगून त्यांनी पेन्शन स्वीकारले नाही. अखेर ४ जुलै १९३४ रोजी ल्युकेमियाने या जगप्रसिद्ध मानवतावादी पहिल्या महिला शास्त्रज्ञ असलेल्या विभूतीचा अंत झाला. योगायोग असा की केवळ एक वर्षानंतर त्यांची मुलगी इरिन हिच सुद्धा ल्युकेमियानेच अंत झाला. किरणोत्सर्गाच्या सततच्या संपर्कामुळे या नोबेल पारितोषिक विजेत्या मायलेकींचा अंत झाला.

चीम्पांझीची मैत्रीण

# जेन गुडाल



जेन गुडाल या लंडनवासी तरुणीने आफ्रिकेच्या जंगलात जाऊन तेथील चीम्पांझी माकडांचे दीर्घकाळ जवळून निरीक्षण केले. त्यांच्या सहवासात राहून त्यांच्या जीवनाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास केला प्रयोग शाळेत किंवा वाचनालयात बसून चीम्पांझी विषयी अंदाजात्मक पुस्तकी निरीक्षणे लिहिणाऱ्या मानववंश शास्त्रज्ञाना आपली चीम्पांझी विषयीची निरीक्षणे आणि व्याख्या बदलण्यास जेनने भाग पाडले. आफ्रिकेच्या जंगलात जाऊन चीम्पांझीचा सहवास मिळवणे, त्यांच्याशी मैत्री करणे हा अत्यंत धाडसी प्रयोग होता किंबहुना आत्मघातकीच होता.

म्हणून तिचे अनुभव हे अत्यंत लोकविलक्षण आणि चित्तथरारक वाटतात. तिची जीवन कहाणी ही वास्तविक वाटत नाही परंतु ती वास्तविक आहे हे सत्य आहे.

आफ्रिकेच्या जंगलात प्रवास करण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी जेन गुडालने लंडनच्या हॉटेलात वेट्रेस म्हणून केलेल्या नोकरीच्या पगारातून नियमितपणे पैसे साठवले. पुरेशी रक्कम जमल्यावर ती आफ्रिकेतील केनिया castle येथे गेली. ती आफ्रिकेला जाणार आहे असे कळल्यावर तिच्या परिचितांनी तिला वेड्यातच काढले, कारण लंडन सोडून कुणी आफ्रिकेला का जावे हे कुणाला न उलगडणारे कोडे होते. पण तिच्या आईचा तिच्यावर खूप विश्वास होता ती जेनला म्हणाली "जर तू कठोर परिश्रम करत असशील तर येणाऱ्या प्रत्येक संधीचा फायदा घे. कोणतीही संधी सोडू नकोस ! तुला तुझ्या आयुष्याचा मार्ग निश्चितपणे सापडेल"

चीम्पांझीसाठी राखून ठेवलेल्या गोंबे स्ट्रीम भागात चीम्पांझीचा अभ्यास करण्यासाठी सतत सहा वर्ष जेन एका तंबूत राहिली होती. विशेष म्हणजे तिची आई तिच्या बरोबर राहिली होती. गोंबे स्ट्रीम या भागात तंबूत राहत असताना दररोज डास, सर्प, कीटक, आणि चोरट्या बबुन जातीच्या माकडांशी त्यांना सामना करावा लागत होता प्राणावर बेतणारी संकटे आपणहून झेलण्याचा वेडा अट्टाहास करून चीम्पांझी सारख्या माकडांचा अभ्यास करण्यासाठी तंबूत राहणारी जेन गुडाल आणि सतत सहा वर्ष आपल्या तरुण मुलीला साथ देणारी तिची आई सुद्धा जगावेगळीच होती. निरीक्षणाबाबत तिने लिहिले आहे "सतत तीन तास चीम्पांझी अनेक मुलांना दुध पाजत असतात. अनेकदा झाडाझुडूपातून जात असताना मला रांगत जावे लागे. जेनला चीम्पांझी कडून अनेकदा बेदम मार देखील बसला होता. या प्रसंगाचे वर्णन करताना ती म्हणते छोट्या छोट्या झुडूपानीच मृत्युच्या खाईत होणारा माझा कडेलोट थोपवला होता. आफ्रिकेच्या टांगानिका तलावाच्या काठावर एके दिवशी दुपारच्या प्रहरी निरीक्षण करताना चीम्पांझीला

गवताच्या देठाने मातीचे वारूळ खणून त्यातून त्याला खाण्यासाठी किडे काढताना तिने पाहिले तसेच झाडांच्या फांद्या तोडून त्यांची हत्यारे करताना तिने पहिले. तिचे हे निरीक्षण आणि अनुभव ऐतिहासिक ठरला. तोपर्यंत फक्त माणूस हत्यारे बनवू शकतो चीम्पांझी नाही असे प्राणी शास्त्रज्ञांकडून सांगितले जात असे. पण वीस वर्षाच्या जेन सारख्या आर्थिकदृष्ट्या गरीब, महाविद्यालयीन पदवी न घेतलेल्या तरुणीने प्रथम प्राणी शास्त्रज्ञांचा सिद्धांत खोडून टाकला चीम्पांझीना माणसांप्रमाणेच स्वतंत्र व्यक्तिमत्व असते, असे गृहीत धरून जेन ने प्राणी शास्त्राच्या क्षेत्रात क्रांतीच केली.

जेनच्या कामाचा आढावा घेताना अमेरिकन पुरातत्व संशोधक डायन फ़ॉसि हिने गोरिला जातीच्या माकडांच्या संदर्भात केलेले कार्य आणि आपल्या प्राणांचे दिलेले बलिदान आठवते. डायन फ़ॉसिसारखी संशोधक जर जन्माला आली नसती तर कदाचित आज गोरिला जातीच्या माकडांचा निर्वंश झाला असता. गोरीलाची शिकार करणाऱ्या धंदेवाईक टोळयाविरुद्ध तिने जोरदार लढा दिला. गोरीलाना वाचवण्यासाठी अक्षरशः प्राण जाईपर्यंत निष्ठेने लढत राहिली. १९८५ मध्ये तिच्या तंबू जवळच तिची हत्या केली गेली.

डायन फ़ॉसि काय किंवा जेन गुडाल काय यांना प्रखर ध्येयवादावर निष्ठा ठेवून प्राणांची पर्वा न करता भौतिक सुखांचा त्याग करून एकाकीपणे लढण्याची शक्ती कोण देतो? कोणती पुस्तके, कोणते संस्कार, कोणत्या प्रेरणा, कोणते गुरु, कोणत्या पदव्या त्यांना आयुष्य ध्येयनिष्ठेसाठी झोकून देण्यास उद्युक्त करतात? केवळ स्वयंप्रेरणाच डायन फ़ॉसि किंवा जेन गुडाल सारख्यांची आयुष्ये उजळून टाकतात

धाडसी पत्रकार

## नेली ब्लाय



नेली ब्लाय ही जगप्रसिद्ध अमेरिकन पत्रकार. वाचकांना सत्य जाणण्याचा अधिकार आहे आणि तो त्यांना मिळवून देण्यासाठी वाट्टेल ते करण्याची तिच्या मनाची तयारी असे. अनेक गुपिताना तिने आपल्या लेखणीने वाचा फोडली लोकांपासून लपलेल्या काही गोष्टी उघड करण्यासाठी नेली ब्लायने कधी पॉकेटमार मुलीची भूमिका केली तर कधी वेश्या झाली.

कधी कारखान्यातील कामगार तर कधी समूहगीत गायिकेची भूमिका केली. तिचा स्वभाव बंडखोरीचा होता. बातमी मिळवण्यासाठी जग उलथे पालथे करण्याची तिची वृत्ती होती. वेड्यांच्या इस्पितळात ती वेडी म्हणून घुसली होती. कारखान्यात जशी कामगार म्हणून घुसली तशीच कैदी होऊन तुरुंगात ही फिरून आली.

इ. स. १८६५ मध्ये एलिझाबेथ कोचार्ण चा जन्म झाला. लहानपणीच तिने रस्त्यावर भिक मागणारी मुले दारिद्र्याशी झगडणारे लोक आणि ज्यांना अगदी मुलभुत हक्क नाकारले गेले होते अशा स्त्रियांची जगण्याची धडपड नेलीने पहिली होती. त्यामुळे ती खूप अस्वस्थ होती. केंव्हा न केंव्हा आपण परिस्थिती बदलवू असा तिला विश्वास वाटत होता.

वयाच्या विसाव्या वर्षी तिला पहिली संधी प्राप्त झाली. पीटर्सबर्ग मध्ये घटस्फोटीत महिलांच्या कथा चित्रित करून स्थानिक वृत्तपत्रास विकल्या. त्या काळात तो विषय फारच धक्कादायक होता तसेच प्रक्षोभक ही होता. काहींना तो असभ्य वाटला तर काहींना त्या बौद्धिक खाद्य देणाऱ्या कथा वाटल्या. मत प्रवाह भिन्न भिन्न असला तरी नेलीच्या कथांमुळे वृत्तपत्रांची विक्रमी विक्री झाली हे सत्य होते. तिच्या वृत्तपत्र संपादकांनी 'नेली ब्लाय' हे त्या काळातील लोकप्रिय गीताचे शीर्षक असलेले टोपणनाव दिले आणि आपल्या वृत्तपत्राची पहिली महिला पत्रकार म्हणून नोकरीत ठेवले. हळूहळू स्थानिक वृत्तपत्र

तिच्या कार्यक्षेत्रास कमी पडू लागली. तेंव्हा  ती देशातील सर्वात मोठे वृत्तपत्र न्यूयॉर्क वर्ल्ड चे संपादक जोसेफ पुलित्झर यांना भेटली

वेड्याचे  नाटक करून ती वेड्यांच्या इस्पितळात दाखल झाली तिथे तिने नरकयातना देणारे महाभयानक दहा दिवस घालवले. शेवटच्या काही दिवसात तिने इस्पितळातील अधिकाऱ्यांना आपण वेडे नसल्याचे पटवून देण्याचा प्रयत्न केला. शेवटी न्यूयॉर्क वर्ल्डच्या वकिलाने तिला मुक्तता मिळवून दिली. वेड्यांच्या इस्पितळातील गजाआडच्या मनोरुग्णांच्या इस्पितळातील व्यवस्थेवर लिहिलेल्या नेलीच्या स्टोरीने सगळीकडे खळबळ उडवली. सर्वच वृत्तपत्रांनी 'धाडसी महिला पत्रकार' असलेल्या नेलीची कथा देशभर उचलून धरली. नेली जेंव्हा जगप्रवास करत होती तेंव्हा तिच्यावर गाणी लिहिली गेली. तिच्या कपड्यांच्या  हेअर स्टाइलची मुली कॉपी करू लागल्या होत्या. तिची travel cap सर्व वयोगटात फ़ेमस झाली होती. अशी प्रसिद्धी आणि दुर्मिळ लोकप्रियता लाभलेल्या नेलीने आपली पत्रकारितेची शैली कधी सोडली नाही.

पत्रकारितेच्या क्षेत्रातील नेली हि एक जागतिक पातळीवरील चांगली वार्ताहर होती. अशा या अलौकिक पत्रकार असलेल्या नेली ब्लायने आपल्या वयाच्या ५५ व्या वर्षी या जगाचा निरोप घेतला

गुलामांची उद्धारकर्ती

# हॅरियट टबमन



एकोणिसाव्या शतकात अमेरिकेत कृष्णवर्णीयांना किंवा निग्रोंना गुलाम म्हणून विकत घेऊन राबविण्याची कुप्रसिद्ध समाज पद्धती होती. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस जन्माला आलेली harriet टबमन ही एक अशीच गुलाम होती. म्हणूनच गुलामगिरी विरुद्ध लढण्याचे धैर्य तिला तात्कालीन समाजरचनेने दिले असावे अमेरिकेच्या इतिहासातील अत्यंत परिणामकारक आणि धाडसी अशा बंडखोरांपैकी एका बंडासाठी हॅरियटने आपले आयुष्य पणाला लावले होते.

आपल्या नशिबी आलेले आयुष्य विनातक्रार

स्वीकारणाऱ्या आणि पिढ्यानपिढ्या गुलामगिरीत राहणाऱ्या अन्य गुलामांप्रमाणे जगणे हॅरियटला मान्य नव्हते. कोणत्या प्रकारचे आयुष्य आपल्या वाट्याला आले आहे आणि कोणत्या प्रकारचे आयुष्य आपल्यासाठी असायला हवे याचा गांभीर्याने विचार करूनच हॅरियट कृतीशील झाली वयाच्या एकोणतिसाव्या वर्षी तिने गुलामगिरी विरुद्ध लढणारी सर्वात भीतीदायक पुढारी म्हणून आपली कारकीर्द सुरु केली होती. हॅरियटला आपल्या जीवन उद्दिष्टांचा मार्ग सापडला होता. जणू black मोझेसचाच तिच्या रूपाने नवा जन्म झाला होता. गुलामीत असलेल्या आपल्या शेकडो बांधवाना गुलामगिरीच्या क्रूरतेपासून पळून जाण्यासाठी सुमारे वीस वेळा हॅरियटने अत्यंत धोकादायक अशा दक्षिणेतील मोहिम आखून त्या यशस्वीरित्या पार पाडल्या होत्या. आपल्या बांधवांची गुलामगिरीतून सुटका करण्याच्या योजनेतील ती एक तज्ञच ठरली होती. प्रस्थापितांना त्रास देण्याची तिची शक्ती जसजशी वाढत गेली तसतसा तिचा उत्तर - दक्षिण प्रवास अधिकाधिक धोकादायक होत गेला.

गुलामांच्या मालकांना हॅरियटला कैद करायचे होते. तिच्या अटकेसाठी त्यांनी त्यावेळी ४० हजार अमेरिकन डॉलर्स एवढी प्रचंड रक्कम जाहीर केली होती. हॅरियटने गुलामगीरीतील तिच्या बांधवाना मुक्त करण्यासाठी पराकोटीचे नेतृत्व कौशल्य दाखवले होते. त्यामुळेच तिला blak मोझेस असे संबोधले जात होते. हॅरियटची धाडसी कृत्ये सिव्हिल वॉर पर्यंत सुरु होती.

नंतर ती लष्करात शिपाई म्हणून भरती झाली. तेंव्हा उत्तर अमेरिकेची गुप्तहेर म्हणून कार्य केले. त्या वेळी शत्रूचा निःपात करून शेकडो गुलामांना तिने मुक्त केले होते. तिचे केंद्रीय लष्करातील योगदान मान्यताप्राप्त ठरले होते. असे असून सुद्धा निवृत्ती नंतर लगेच दिली जाणारी पेन्शन ची रक्कम हॅरियटला मात्र युद्धानंतर ३० वर्षांनी मिळाली. युद्धानंतर समाजातील सदोष गोष्टी निर्दोष कशा केल्या जातील याकडे ती दक्षतेने पाहू लागली. हॅरियटने वृध्द आणि अत्यंत दरिद्री माणसांसाठी 'हॅरियट टबमन होम' नावाची संस्था स्थापन केली होती. हॅरियट टबमन ही लष्करी शिस्तीची होती. मुक्ततेच्या मार्गाकडे गुलामांना नेत असतांना त्यांच्या पैकी कुणी जर भीतीने परत आपल्या मालकाकडे जाऊ लागला तर त्याला रिव्हॉल्वर चा धाक दाखवून हॅरियट त्याचे मतपरिवर्तन करीत असे.

अशा प्रकारे अमेरिकेतील गुलामगिरी विरुद्ध हॅरियटने प्रदीर्घ काळ यशस्वीपणे लढा दिला. उर्वरित आयुष्यात तिने विधायक कार्य केले. १९१३ साली आपणच स्थापन केलेल्या 'हॅरियट टबमन होम' मध्ये वास्तव्यास जाऊन तिने जगाचा शांतपणे निरोप घेतला.

# ई साहित्य प्रतिष्ठान

मित्रहो , सहजासहजी काहीच मिळत नाही. केवळ अश्रू गाळून किंवा चिंता करून संकटं टळत नसतात. न स्वातंत्र्य, न मुक्ती, न प्रगती. काहीही मिळवायचं तर संघर्ष आणि श्रम करावेच लागतात. “गोलमाल” करून सर्व काही मिळवता येतं असा समज माध्यमांद्वारे सर्वत्र पसरवला जात असताना अशी चरित्रं वाचून माणूस “जमिनीवर” येतो. आपल्याला आज मिळणाऱ्या प्रत्येक गोष्टीसाठी कोणी ना कोणी अतोनात कष्ट घेतलेले आहेत वा संघर्ष केलेला आहे. अगदी मताचा अधिकार असो वा देवीची लस. कोणतीच गोष्ट आपोआप मिळत नाही. प्रत्येकाचं मूल्य असतं.

ई साहित्य प्रतिष्ठानची पुस्तकं विनामूल्य मिळतात. पण ती लिहिण्यासाठी लेखकांचे कष्ट व बुद्धी लागलेले असतात. आणि या एकेका पुस्तकाची किंमत म्हणुन लेखक हजारो लाखो रुपये मिळवू शकतात. पण मराठी वाचकांना  विनामूल्य पुस्तकं मिळावित, व मराठीत वाचन संस्कृती वाढावी म्हणून असंख्य लोक प्रयत्न करीत आहेत. या प्रयत्नांत ई साहित्य प्रतिष्ठान व हे सर्व लेखक सहभागी आहेत. आपण या अभियानात सहभागी झालात का?

आपण ई साहित्य प्रतिष्ठानचे VIP सभासद झालात का?

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे.

आपल्या ओळखीच्या दहा लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद.

एका दमात तीन कामं.

1. पहिलं म्हणजे तुम्ही VIP सभासद बनता. तुम्हाला ई साहित्य प्रतिष्ठानचं पुस्तक ई मेलवर सर्वात आधी मिळतं. त्यांच्या कार्यक्रमाचं आमंत्रण मिळतं. त्यांच्या योजनांची माहिती मिळते. त्यांच्या कामात स्वतः सहभागी होण्याची संधी मिळते.

2. ज्या दहा किंवा अधिक मित्रांना तुमच्यामुळे फ़्री पुस्तकं मिळतात ते खुश होतात. त्यांना त्यांच्या आवडीची पुस्तकं मिळाली की ते इतर लोकांना तुमच्याबद्दल सांगतात. त्यांच्यासाठी तुम्ही म्हणजेच ई साहित्यचे प्रतिनिधी बनता.

3. यातून तुम्ही मराठी भाषेच्या संवर्धनाला अमूल्य असा हातभार लावता. आमचा उद्देश आहे मराठीतल्या सहा कोटी साक्षरांना वाचक बनवणं. आणि हे लक्ष्य साध्य करणं हे केवळ आणि केवळ मराठी लोकांना त्यांच्या भाषेवर असलेल्या प्रेमातूनच शक्य आहे. आपल्या भाषेचं राज्य व्हावं म्हणून १०६ हुतात्मे झाले. आपल्या भाषेनं राजा व्हावं म्हणून आपण एक दहा-वीस ई मेल आयडी देणारच ना! वाचनाची आवड असो वा नसो. फ़क्त मराठी साक्षर अशा दहा लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांना वाचनाची आवड आपोआप लागेल. आपणच लावू. लावूच लावू. करूनच दाखवू.

आहे ना : एक दम : तीन कामं.

संपर्क साधा : esahity@gmail.com

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

अधिक माहितीसाठी, आम्ही कोण ते जाणून घेण्यासाठी एकदातरी www.esahity.com या वेबसाईटला भेट द्या.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com